महाराष्ट्र शासन
**ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई - ४०० ००१**
**दूरध्वनी क्र.** :- (०२२) २२६६४६३८/२२६७१३३३ **फॅक्स क्र.** :- २२६६४६३८
**Website**:-www.dol.maharashtra.gov.in **E-mail**:- director.dol@maharashtra.gov.in

जा. क्र.३१/ अ.स.नि.प्रसिध्दी /२०१९-२०/ १५३०७-०८ दिनांक:- ०५/१२/२०१९

# निवेदन

## ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई - ४०० ००१

भारत सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्गत राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या असमान निधी योजनेंतर्गत राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगिण विकासासाठी अर्थसहाय्याच्या विविध योजना ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत राबविण्यात येतात. त्या संदर्भातील नियम, अटी व अर्जाचा नमुना राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या www.rrrlf.gov.in या या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. राज्यातील इच्छुक शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांनी अर्जाचा नमुना सदर संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावा.

**सन २०१९-२० साठीच्या असमान निधी योजना पुढील प्रमाणे आहेत. (Non Matching Schemes)**

१) **ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना ग्रंथ, साधन साम्रगी, फर्निचर, इमारत बांधकाम व इमारत विस्तार यासाठी असमान निधीतून अर्थसहाय्य.**
२) **"राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान ज्ञान कोपरा" विकसित करण्यासाठी अर्थसहाय्य.**
३) **महोत्सवी वर्ष जसे ५०/६०/७५/१००/१२५/१५० वर्ष साजरे करण्यासाठी अर्थसहाय्य.**
४) **राष्ट्रीय स्तरीवरील चर्चासत्र, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग व जागरुकता कार्यक्रम आयोजनासाठी अर्थसहाय्य.**
५) **बाल ग्रंथालय व राजा राममोहन रॉय ग्रंथालय बाल कोपरा स्थापन करण्याकरीता अर्थसहाय्य.**

➢ **उपरोक्त योजनेसाठी करावयाचा अर्ज :-**

वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी प्रतिष्ठानचे www.rrrlf.gov.in हे संकेतस्थळ पहावे. आवश्यकता असल्यास संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. ग्रंथालयांनी वरील पैकी कोणत्याही एका योजनेसाठीचा प्रस्ताव विहित मार्गाने व मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह इंग्रजी / हिंदी भाषेत चार प्रतीत संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयास दि. २० डिसेंबर, २०१९ पर्यत पोहचतील अशा बेताने पाठवावेत, असे आवाहन श्री. सुभाष हि. राठोड, प्र. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई यांनी राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना केले आहे.

(सुभाष हि. राठोड )
**ग्रंथालय संचालक**

*******